पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८
मा.शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक ८
**सभावृत्तांत**

दिनांक - १९/०९/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १९/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र- **सभापती**
२) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा.सौ.साळुंखे सविता सुरेश
४) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू

या शिवाय मा.गावडे – नगरसचिव, मा.भदाणे – उपसंचालक नगररचना हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आला.**

**विषय क्र.३)** जुन्या हद्दीची मंजूर विकास योजना – पिंपरी चिंचवड विकास योजना सुधारित करणे.

----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक - १
दिनांक - १९/०९/२०१३ विभाग – नगररचना
सूचक – मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक – मा.सविता साळुंखे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१५/पिंपरी/१०/२०१३, दि. ०३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मोरवाडी स.नं.१५०, १५१, १५२ येथे आरक्षण क्र.९१ मधील पार्क या आरक्षणातील पश्चिमेकडील २०५००.०० चौ.मी.क्षेत्र आणि आरक्षण क्र.९५ सांस्कृतिक केंद्र २००० मी. असे एकूण सुमारे २२५००.०० चौ.मी.क्षेत्र या आरक्षणातून वगळून प्रस्तावा सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.९५

बहुउद्देशिय कलाकेंद्र या प्रयोजनासाठी आरक्षित करणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये पुर्नफेरबदल बाबत कार्यवाही प्रसिध्दीस देऊन त्यावरील प्राप्त हरकती, सुचना यावर सुनावणी घेऊन शासनास फेरबदल प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्तांना अधिकार देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ | विषय क्रमांक - २

दिनांक - १९/०९/२०१३ | विभाग – नगररचना

सूचक – मा.शांताराम भालेकर | अनुमोदक – मा.सविता साळुंखे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३, दि. ०४/०९/२०१३

**विषय क्र.२)** पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत....

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ३० | विषय क्रमांक - ३

दिनांक - १९/०९/२०१३ | विभाग – नगररचना

सूचक – मा.सविता साळुंखे | अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१०/५९१/२०१३, दि. ०४/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

विकास योजना सुधारित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही सुरु करणेत येत आहे. सन २०११ मध्ये उक्त अधिनियमा मध्ये सुधारणा करणेत आली असून दि.०५/०४/२०११ पासून अंमलात आली आहे. त्यानुसार विकास योजना तयार करणेचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

| कलम | कार्यवाहीचा तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| २३ | विकास योजना सुधारित करणेचा इरादा जाहिर झालेनंतर हरकती / सुचना मागविण्याचा कालावधी व कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी नेमणूक करणेचा ठराव करणे. | सदर ठराव शासकीय राजपत्रात प्रसिध्द झालेनंतर हरकती / सुचना मागविण्यासाठी ६० दिवस मुदत देणे. |

| | | |
|---|---|---|
| २६ | विकास योजनेचे प्रारुप तयार करून राजपत्रात प्रसिध्द करणे. | इरादा राजपत्रात प्रसिध्द झालेनंतर २ वर्षात अथवा ६ महिन्याची वाढीव मुदत (शासनाच्या मंजूरीने मिळू शकते) म्हणजेच ३० महिन्यात व तदनंतर प्रसिध्द झालेनंतर हरकती / सुचना मागविण्यासाठी ३० दिवस मुदत देणे. |
| ३० | प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करणे. | कलम २६ अन्वये प्रसिध्द झाल्यापासून ६ महिन्यात अथवा वाढीव ६ महिन्याच्या कालावधीत (शासनाच्या मंजूरीने मिळू शकते) म्हणजे १ वर्षात सादर करणे. |

वर नमुद केल्यानुसार विकास योजना तयार करणेच्या विविध टप्प्यात कालावधी निश्चित झालेला आहे. सदर विकास योजना सुधारित करण्याच्या अनुषंगाने पुढील सर्व कामे पार पाडण्यासाठी प्रथमत: महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी यांची नेमणूक आणि तसेच उक्त अधिनियमाच्या कलम २३ अन्वये सदर क्षेत्राची विकास योजना सुधारित करणेकरिता इरादा जाहिर करणे आवश्यक आहे **तथापि इरादा जाहिर झालेनंतर ३ वर्षाच्या आत विकास योजनेची कार्यवाही पुर्ण करुन शासनास सादर करणे आवश्यक आहे.** त्यासाठी विकास योजना सुधारित करणेच्या प्राथमिक टप्पा म्हणजेच प्राथमिक मोजणी, सर्वेक्षण व बेसमॅप (Base Map) करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेमधील उपलब्ध अधिकारी, कर्मचारी यांचेकडील दैनंदिन कामकाज सांभाळून सर्व्हे करणेसाठी जादा वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कामासाठी खाजगी संस्थेची मदत घेऊन सर्व्हे करणेसाठी मा.मनपा सभेची मंजूरी घेणे योग्य होईल. सदर सर्वेक्षण, प्राथमिक मोजणी व बेसमॅप (Base Map) तयार झालेनंतर कलम २३ खाली इरादा जाहिर करणे व कलम २४ खाली नगररचना अधिकारी नेमणूकीबाबत कार्यवाही करता येईल व अधिनियमातील विहित कालमर्यादेत विकास योजना मंजूरीसाठी शासनास सादर करता येईल. त्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जुन्या हद्दीच्या मंजूर विकास योजना क्षेत्राची प्राथमिक मोजणी, सर्व्हेक्षण व बेसमॅप (Base Map) खाजगी संस्थेमार्फत घेणेसाठी आणि त्याकरिता निविदा प्रसिध्द करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८७१ /२०१३
दिनांक - १९/०९/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.1.67\e\e drive\Nagersachiv1\Shahar Sudharana-13-14\proceeding 8_Shahar Sudharana 1.doc